# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
## नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
## दिनांक 12/12/2019 (गुरूवार)
## (सायंकाळ)

---

### घरफोडी

पो.स्टे. उमरेड :- अंतर्गत 2 कि.मी अंतरावर घोडीमारे ले आउट उमरेड येथे दिनांक 11/12/2019 चे 18:53 वा. ते दिनांक 12/12/2019 चे 08:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे- केशव मोरेश्वर सोनटक्के, वय 50 वर्ष, रा. घोडीमारे ले आउट उमरेड चे घराचे अज्ञात आरोपीने कुलूप तोडून घरात प्रवेश केला. तसेच आरोपीने घरामधील कपाटात ठेवलेले सोन्या-चांदीचे दागिने कि. 1,16,000/-रू. व नगदी कि. 20,000/-रू., जर्मनचे भांडे व कपडे कि. 12,000/-रू. असा एकुण कि. 1,48,000/-रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री. विलास काळे हे करीत आहे.

### गळफास लावून मृत्यु

पो.स्टे. काटोल :- अंतर्गत 4 कि. मी. अंतरावर लाडगाव शिवार येथे दिनांक 11/12/2019 चे 09:30 वा. ते 10:00 दरम्यान तीर्थीनंद उर्फ आनंद नारायण चरडे, वय 37 वर्ष, रा. खंडाळा, खुर्द याने कर्जबाजारीपणाचे कारणावरून पेरूच्या झाडाच्या फांदयाला दोरीने गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे- श्रीराम नारायण चरडे, वय 42 वर्ष, रा. खंडाळा, खुर्द यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. काटोल येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला आहे.

### अकस्मात मृत्यू

पो.स्टे. उमरेड :- अंतर्गत 1 कि. मी. अंतरावर मंगळावारीपेठ उमरेड येथे दिनांक 26/11/2019 चे 17.45 वा. दरम्यान दुर्गेश राजहंस पडोळे, वय 19 वर्ष, रा. मंगळवारीपेठ उमरेड यांनी अज्ञात कारणातुन विषारी औषध प्राशन केले. त्यांची प्रकृती खराब झाल्याने उपचाराकरीता प्रथम ग्रामीण रूग्णालय, उमरेड व नंतर मेडीकल कॉलेज, नागपूर येथे भरती केले असता दि. 26/12/19 चे 05:45 वा. त्याचा मृत्यू झाला. संबंधीत कागदपत्र प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे- राजहंस मोतीराम पडोळे, वय 49 वर्ष, रा. मंगळवारीपेठ उमरेड यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास स.फौ. गुलाबराव धुर्वे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर